जा.क्र.११ सआ/परीक्षा व प्रशिक्षण/खाते परीक्षा/२०२५/०८
सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- १ जानेवारी,२०२५

**विषय:- कनिष्ठ श्रेणी कर्मचारी खाते परीक्षा एप्रिल,२०२५................**

**-: परिपत्रक -:**

उपरोक्त प्रकरणी नमूद करण्यांत येते की, शासन अधिसुचना कृषि व सहकार विभाग क्र.सीईएन-१५७९/१९०६/सीआर-१९०२/१२-स, दि.१६.१२.१९८३ तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक विपधो २६२०/प्र.क्र.१६/का-१७/दि.३१/३/२०२१ चे शासन निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. खात्यातील कनिष्ठ श्रेणी कर्मचाऱ्यांची खाते परीक्षा मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर,परभणी, अमरावती व नागपूर या केंद्रावर दिनांक **५ व ६ एप्रिल,२०२५** रोजी घेण्यात येणार आहे.

सदर परिक्षेचे सर्व कामकाज संबंधित केंद्राच्या मुख्यालयातील जिल्हा उपनिबंधक यांनी पहावयाचे आहे. सर्व कर्मचाऱ्यांना खाते परीक्षा, ते ज्या जिल्हयात कार्यरत आहेत त्या जिल्हयासाठी ठेवण्यांत आलेल्या केंद्रावरच देणे अनिवार्य आहे. खातेपरीक्षेसाठी ठरविण्यांत आलेली केंद्रे व त्या केंद्रातंर्गत समाविष्ट करण्यांत आलेले जिल्हे यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | केंद्राचे नांव | समाविष्ट करण्यांत आलेले जिल्हे |
|---|---|---|
| १ | मुंबई | मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड,पालघर |
| २ | नाशिक | नाशिक,धुळे,जळगांव, अहिल्यानगर,नंदूरबार |
| ३ | पुणे | पुणे,सोलापूर |
| ४ | कोल्हापूर | कोल्हापूर,सातारा,सांगली,सिंधुदूर्ग |
| ५ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर,जालना,बीड,धाराशीव |
| ६ | परभणी | परभणी, नांदेड,लातूर,हिंगोली |
| ७ | अमरावती | अमरावती,बुलढाणा,अकोला,वाशिम,यवतमाळ |
| ८ | नागपूर | नागपूर,वर्धा,चंद्रपूर,गडचिरोली,भंडारा,गोंदिया |

ही परिक्षा खात्यातील सर्व विभागात काम करणाऱ्या कनिष्ठ लिपीक तसेच सरळ सेवेतील वरिष्ठ लिपीक,सहाय्यक सहकारी अधिकारी व उपलेखापरिक्षक तसेच तत्सम श्रेणीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना व ज्यांच्या सेवा नियमात अशी तरतूद आहे, अशांना नियमाप्रमाणे पास होणे आवश्यक आहे. या परिक्षेसाठी एकूण ४ पेपर असून परिक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | वार | वेळ | पेपर |
|---|---|---|---|
| ५/४/२०२५ | शनिवार | १०.३० ते १.३०<br>२.३० ते ५.३० | सहकार व सहकारी कायदे (पुस्तकासह)<br>लेखा व हिशोब तपासणी (अकौंट व ऑडीटींग) (पुस्तकाशिवाय) |
| ६/४/२०२५ | रविवार | १०.३० ते १.३०<br>२.३० ते ५.३० | अकौंट टेस्ट (हिशोब) (पुस्तकासह)<br>कार्यालयीन प्रशासन (पुस्तकाशिवाय) |

[कृ.मा.पहा]

**परिक्षार्थ्यासाठी महत्वाचे** – सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक विपधो २६२०/प्र.क्र.१६/का-१७/दि.३१/३/२०२१ चे शासन निर्णयानुसार प्रशासकीय विभागांचे सुधारीत आदेश निर्गमित होईपर्यंत, प्रशासकीय विभागांमार्फत होणाऱ्या विभागीय परीक्षांना, सदर शासन निर्णयातील विभागीय परीक्षेच्या सामाईक तरतूदी लागू राहतील.

१) सदर शासन निर्णय **https://sahakarayukta.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर " महत्वाचे दुवे मधील जी.डी.सी.ॲण्ड ए.मंडळ " येथे पहावयास उपलब्ध आहे कृपया वाचावा.

२) **संधीची संख्या** - शासकीय सेवेतील संबंधित पदावर नियुक्तीच्या दिनांकापासून (सरळसेवा अथवा पदोन्नतीव्दारे नियुक्ती) एकूण ३ संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

३) **संधींची गणना** – शासकीय सेवेत ज्या दिनांकास संबंधित पदावर कर्मचारी रूजू होईल (सरळसेवा अथवा पदोन्नतीव्दारे नियुक्ती आदेशानुसार) त्या रूजू दिनांका नंतर प्रथम ज्या वेळी विभागीय परीक्षेसाठीचा अर्ज सादर करण्याची कार्यवाही सुरू होईल, त्या विभागीय परीक्षेचे आयोजन ही संबंधित शासकीय कर्मचाऱ्याची पहिली संधी म्हणून गणण्यात येईल. तसेच त्यानंतर अनुक्रमे आयोजित होणाऱ्या पुढील दोन परीक्षा या पुढील दुसरी व तिसरी संधी म्हणून गणण्यात येईल.

त्यामुळे, शासकीय सेवेतील संबंधीत पदावर शासकीय कर्मचारी ज्या दिनांकास रूजू होईल, त्या दिनांकापूर्वी जर त्या कॅलेंडर वर्षामधील विभागीय परीक्षेसाठीचा अर्ज सादर करण्याचा दिनांक समाप्त झाला असेल तर संबंधित शासकीय कर्मचारी सदर परीक्षेस बसू शकत नसल्यामुळे सदर आयोजित होणारी परीक्षा ही संधी म्हणून गणण्यात येणार नाही.

४) **ग्रेस मार्क**- त्यास अनुसरून ग्रेस गुण देण्याची पध्दत या परीक्षेस राहणार नाही.

परिक्षार्थीना मराठी किंवा इंग्रजी माध्यमातून उत्तरपत्रिका लिहीता येतील. सदर परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात ५० गुण मिळणे आवश्यक आहेत. **अर्जदारांनी आपले अर्ज कार्यालय प्रमुखांमार्फत या कार्यालयाकडे दिनांक ३ फेब्रुवारी,२०२५ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावयाचे आहेत. विहित तारखे नंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. परीक्षेकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.**

**कार्यालय प्रमुखांनी संबंधितांचे अर्ज या कार्यालकयाकडे पाठविण्यापुर्वी त्यातील सर्व तपशील बरोबर तसेच परिपुर्ण भरला आहे याची खात्री करून घ्यावी व तसा दाखला अर्जासोबत द्यावा. अर्जामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.**

Tawar

**(दिपक तावरे** भा.प्र.से**)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति,**

१. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक,पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. आयुक्त,हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग,महाराष्ट्र राज्य,पुणे
४. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,(सर्व)
५. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,(लेप)(सर्व)
६. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,(सर्व)
७. जिल्हा विशेष लेखापरिक्षक,सहकारी संस्था,(सर्व)
८. प्रादेशिक सहसंचालक(साखर)(सर्व)
९. प्रादेशिक उपआयुक्त,हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग(सर्व)

१०. सहनिबंधक,आदिवासी उपाययोजना,नाशिक
११. मा.न्यायाधिश सहकारी न्यायालय,(सर्व)
१२. तालुका उपनिबंधक/सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था(सर्व)
१३. सहनिबंधक,सहकारी संस्था,(दुग्ध) मुंबई
१४.सहनिबंधक,सहकारी संस्था, अपील,मुंबई
१५.महाराष्ट्र राज्य,सहकारी अपील न्यायालय,मुंबई/पुणे
१६.विशेष कार्य अधिकारी, लेखापरिक्ष मंडळ(पदुम) महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, सी-फेस,मुंबई-१८
१७. कार्यासन अधिकारी, मुख्यालय,(सर्व)

(दिपक तावरे भा.प्र.से)
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे.**

## वर्ग-३ खातेपरीक्षा अर्जाचा नमुना- एप्रिल,२०२५

**प्रपत्र * अ *(नियम ६(१) पहा)**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदारचे संपूर्ण नांव(मराठी)(प्रथम आडनाव) | |
| २ | अर्जदारचे संपूर्ण नांव(इंग्रजी)(प्रथम आडनाव) | |
| ३ | हुददा / पदनाम | |
| ४ | भ्रमनध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ५ | कांर्यालयाचे नाव, तालुका, जिल्हा | |
| ६ | कार्यालयाचा पत्ता | |
| ७ | सरळसेवा भरतीने की पदोन्नतीने नियुक्ती झाली आहे की? | |
| ८ | सध्याचे वर्ग -३ मधील पदावरील प्रथम नियुक्तीची तारीख | |
| ९ | सध्याचे वर्ग -३ मधील पदावरील पदोन्नतीची तारीख | |
| १० | शैक्षणिक पात्रता | |
| ११ | **१.जी.डी.सी.ॲन्ड ए परिक्षा पास असल्यास प्रत जोडावी.**<br>२.अर्जदार वाणिज्य पदवीधर असल्यास व त्याचा ॲडव्हान्स व अकौटन्सी व ऑडीटींग हा स्पेशल विषय असल्यास प्रत जोडावी<br>३.अर्जदार यापुर्वी महाराष्ट्रातील सहकारी प्रशिक्षण संस्थातून सहकारातील उच्च पदविका प्रमाणपत्र ( Higher Diploma in Co-operative) उत्तीर्ण असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित झेरॉक्स प्रत जोडावी | परिक्षेचे वर्ष- केंद्र-<br>बैठक क्रमांक- |
| १२ | खात्याच्या परिक्षेला यापुर्वी बसले असल्यास **कितवी संधी** ते लिहावे अन्यथा **नविन** असे लिहावे | |
| १३ | प्रथम प्रयत्न नसल्यास यापुर्वी घेतलेले सर्व संधीचा क्रमांक व वर्ष यांचा उल्लेख करावा | |
| १४ | परिक्षेमध्ये विषयांस सुट(Exemption) मागणी असल्यास या विषयांस सूट मिळण्याइतकेमार्कस मिळाल्याचा तपशिल- (गुणांचा उल्लेख असलेल्या निकालाची प्रत जोडावी) | विषय- वर्ष- केंद्र- गुण- |
| १५ | एप्रिल, २०२५ चे परिक्षेत या विषयामध्ये सुट मिळावी अशी मागणी /इच्छा आहे का? | |

दिनांक:-

अर्जदाराची सही

नाव व कार्यालयाचा संपूर्ण पत्ता

**[कृ.मा.पहा]**

## कार्यालय प्रमुखाने द्यावयाचा दाखला

अर्जदाराने दिलेला तपशिल मी कार्यालयीन रेकॉर्डच्या आधारे तपासून पाहिले असून ते बरोबर आहे. अर्जदार नियमाप्रमाणे परिक्षेस बसण्यास पात्र आहे.

**दिनांक:-** **कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का**

**टिप:-** (१) अर्ज कार्यालय प्रमुखामार्फत अंतिम दिनांकापुर्वी सादर करावा, विहित तारखेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. (२) अर्जदार जी.डी.सी.अॅन्ड ए. परिक्षा पास असल्यास उत्तीर्ण प्रमाणपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत जोडावी.(विषय क्र.१ व २ च्या सुटसाठी) (३) अर्जदार वाणिज्य पदवीधर असल्यास व त्याचा *** अॅडव्हान्स अकौटन्सी व ऑडीटींग *** हा स्पेशल विषय असल्यास साक्षांकित **प्रमाणपत्रांची** झेरॉक्स प्रत जोडावी.(विषय क्र.२ च्या सुटसाठी) (४) अर्जदाराने पूर्वी मिळालेली सूट अर्जात स्पष्ट नमूद न केल्यास त्यास संबंधित विषयास सूट नको आहे असे समजण्यात येईल.

**********